नियमीत दिवाणी मुकदमा क्र.०८/२०२२ (श्री. किशोर केरकर – वादी वि. श्री. रमाकांत केरकर वगैरे –प्रतिवादी ) मधील नि. ७१ वरील आदेश

१. अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. प्रतिवादी क्र. ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांचे विरुध्द दावा 'विना कैफियत' चालविणेबाबतचा झालेला आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांचे म्हणणे की, प्रतिवादी यांना आवश्यक ती माहिती व कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने त्यांना मुदतीत आपली कैफियत दाखल करता आली नाही . त्यांची कैफियत दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. तरी प्रतिवादी क्र . ३ यांनी त्यांचेविरुध्द दावा 'विना कैफियत ' चालविणेबाबतचा झालेला आदेश रद्द होवून त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात यावी अशी विनंती केली आहे.

२. वादीने प्रस्तुत अर्जावर आपले म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. वादीचे म्हणणे की, अर्जात नमुद कारण खोटे व खोडसाळ आहे. सबब अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे . तसेच अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास प्रतिवादी यांनी वादीला रक्कम रुपये १००० /– खर्च देण्याचा आदेश व्हावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

३. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी क्र . ३ यांना उचितरित्या दाव्याचे समन्स बजावणी होवून ते दाव्याचे कामी हजर झाले आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०८, नियम १ अन्वये प्रतिवादी यांना उचित संधी देवून देखील त्यांनी विहित मुदतीत आपली कैफियत दाखल केलेली नाही . प्रतिवादी यांनी दाखल केलेला प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीनंतर दाखल केलेला आहे. वादीने प्रस्तुतचा दावा , हक्कप्रस्थापना व कायम व आज्ञार्थी ताकीद

आदेशासाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी क्र . ३ यांना दाव्यामध्ये आपली कैफियत दाखल करुन त्यांचा बचाव मांडण्याची संधी देणे न्यायोचित होईल. प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये असणारा खरा वाद अंतिमरित्या न्यायनिर्णित करण्यास न्यायालयाला मदतच होणार आहे. प्रतिवादी क्र. ३ यांची कैफियत दाखल करुन घेतल्यास वादी यांचे काहीही नुकसान होणार नाही . परंतु प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दाखल केला असल्याने त्यांचेवर उचित खर्च आकारुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. प्रतिवादी क्र. ३ यांनी वादीला रक्कम रुपये १००/–(रुपये शंभर मात्र ) इतका खर्च देणेचे अटीवर प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल.

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2023.07.10 17:14:55 +0530

(अ. जो. बाचुलकर)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुडाळ.

ठिकाण : कुडाळ.
दिनांक – १०/०७/२०२३